# प्रेसनोट दिनांक १३/०४/२०२३

## पिंपरीमध्ये टी-२० क्रिकेटवर सट्टा घेणाऱ्यांवर पिंपरी पोलीसांची कारवाई

दि.१२/०४/२०२३ रोजी पोलीस अंमलदार २६५७ रेड्डी यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक इसम सध्या चालु असणाऱ्या आयपीएल टी-२० राजस्थान रॉयल विरूध्द चेन्नई सुपर किंग या मॅचवर बेटीग घेत आहे, अशी बातमी मिळताच सदरबाबत मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शंकर आवताडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पिंपरी पोलीस स्टेशन यांना कळविली असता, त्यांनी सदर इसमास ताब्यात घेवुन कायदेशीर कारवाई करण्याचे मुफजल आदेश दिल्याने लागलीच स्टाफ सह रवाना होवुन पिंपरी मार्केट परीसरात जावुन शोध घेतला असता, बातमिदाराने दिलेल्या माहीतीप्रमाणे एक इसम मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन नाव व पत्ता विचारता त्याने आपले नाव रोशन जितेंद्र मायारामानी, वय २७ वर्षे, रा. कान्हा विहार बिल्डींग, फ्लॅट नं. १४, तिसरा मजला, लस्सी घराचे जवळ, साई चौक, पिंपरी, पुणे असे असल्याचे सांगुन त्याचेकडे अधिक चौकशी करता तो त्याचे जवळील मोबाईल फोनव्दारे चालु क्रिकेट सामन्या दरम्यान, ग्राहकांना दिलेला त्याचा मोबाईल वर ग्राहक कॉल करुन व त्याचे फोनमध्ये असलेल्या 'क्रिकेट मझा ११' नावाचे ॲपवर बेटींगचे भाव पाहुन ग्राहकांना सांगतो व त्यांनी बेटींग लावल्यावर ते पुढे त्याचे मालक सनी सुखेजा, वय अंदाजे ३५ वर्षे, रा. पिंपरी, पुणे व आशु आसवानी, वय अंदाजे ३५ वर्षे, रा. पिंपरी, पुणे यांना कळवित असतो व ते दोघे ग्राहकांनी त्यांचेकडे डिपॉजिट केलेल्या रक्कमेतून बेट लावतात असे सांगीतले असल्याने सदरबाबत कायदेशीर कारवाई करून महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ), इंडीयन टेलीग्राफ ॲक्ट कलम २५(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीस पकडल्याची माहिती मिळताच त्याचे दोन साथीदार फरार झाले असुन त्यांचा शोध सुरू आहे. दाखल गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक श्री. अनिरूध्द सावर्डे पिंपरी पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

सदर कामगिरी मा.श्री. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा.श्री. मनोजकुमार लोहिया पोलीस सह आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा.श्री. संजय शिंदे अपर पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा.श्री. विवेक पाटील पोलीस उप आयुक्त सो परिमंडळ १ पिंपरी चिंचवड, मा.श्रीमती प्रेरणा कट्टे सहायक पोलीस आयुक्त सो पिंपरी विभाग पिंपरी चिंचवड, श्री. शंकर आवताडे सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक पिंपरी पोलीस ठाणे, श्री. भोजराज मिसाळ पोलीस निरीक्षक गुन्हे पिंपरी पोलीस ठाणे यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री. अनिरूध्द सावर्डे, सपोफौ भांडवलकर, पो.हवा. बारशिंगे, पो.हवा. हांडे, पो.ना. करपे, पो.ना. बागसिराज, पो.ना. भारती, पो.ना. महाडीक, पो.शि. शेख, पो.शि. जानराव, पो.शि. रेड्डी यांनी केली आहे.